# द नाईट ट्रेन ॲट देओली ॲंड आदर स्टोरीज

**रस्किन बाँड**

अनुवाद

**श्यामला रा. पेंडसे**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

The Night Train at Deoli and Other Stories : Ruskin Bond
Marathi translation by Shamla Pendse
First published in English by Penguin Books India 1988
Copyright © Ruskin Bond 1988
First published in Marathi by Riya Publications in arrangement with Penguin Books India.

**द नाईट ट्रेन ॲट देओली अँड आदर स्टोरीज :** रस्किन बाँड
अनुवाद : श्यामला रा. पेंडसे

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
श्यामला रा. पेंडसे
१/बी, फ्लॅट नं. ५, दुसरा मजला, नवजीवन सोसायटी,
मोरी रोड, माहीम, मुंबई- १६
फोन नं. ०२२-२४४६४६४१

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३७०/-

**अर्पण**

D साठी–
आठवणींना उजाळा दिल्याबद्दल धन्यवाद!

# प्रस्तावना (ओळख)

माझे लिखाण प्रेमपूर्वक वाचणाऱ्या गोड वाचकांनो,

तुम्हाला मी नेहमीच्याच जुन्या पुराण्या पद्धतीने संबोधत आहे; कारण तसं करणं एक तर मला आवडतं आणि मला खात्री आहे की, फक्त तुमच्यासारख्या मृदू अंत:करणाच्या वाचकांनाच माझ्या लघुकथा आवडणार आहेत.

वाचकांना धक्का देणाऱ्या किंवा अप्रिय पद्धतीच्या लघुकथा मी लिहूच शकत नाही. मनाचं संतुलन गमावलेले खुनी, नपुंसक लोक, युद्धवीर, स्वत:लाच जखमी करणाऱ्या चित्रतारका किंवा हेरगिरी करणारे लोक या जगात असतातच; पण आश्चर्य वाटावी अशी ही गोष्ट आहे की, त्यांच्यापैकी कोणीच मला भेटलेले नाही. म्हणूनच आयुष्य जगताना ज्या लोकांचे जीवन मी अनुभवले, जे मला भेटले, ज्या जागा मी पाहिल्या, त्यांच्याबद्दलच लिहिणं मी पसंत केलं. कादंबरीपेक्षाही लघुकथा लिहिताना या सगळ्यांचा उपयोग होतो आणि या दोन्ही माध्यमातून जरी मी लिखाण केले असले; तरीही मला कादंबरीकार होण्यापेक्षा लघुकथा लेखक होणं जास्त आनंद देतं.

माझ्या कथांमधून मी खूप वेळा डोकावत असतो आणि म्हणूनच माझं हे पुस्तक तुम्ही आत्मचरित्र म्हणूनही समजू शकता. एक प्रकारे माझ्या लेखनातील ही त्रुटी आहे; परंतु याला इलाज नाही, हे मला माहीत आहे. किंबहुना मी याच प्रकारचा लेखक आहे, तसाच माणूस आहे.

जवळजवळ तीस वर्षांच्या माझ्या लेखनाच्या काळात मी बऱ्याच प्रेमकथा लिहिल्या, याचे मला आश्चर्य वाटते किंवा त्या सर्व या ना त्या प्रकारे प्रेमकथाच आहेत. वास्तवात, मी माझ्या विषयाच्या प्रेमात पडल्याशिवाय लिहूच शकत नाही. वाङ्मय कसे असावे, याचे कायदेकानून ज्यांनी बनविले आहेत, त्यांच्या

दृष्टीने ही माझ्यातील एक कमतरता आहे; परंतु मी कधीही तसे कायदेकानून पाळून लिहिले नाही.

'Romance brought up the nine-fifteen' असे किपलिंगने लिहिले होते आणि १९५० मध्ये लिहिलेल्या माझ्या कथांत (मी जेव्हा तारुण्याच्या उंबरठ्यावर होतो, अगदी विशीत होतो) प्रेमभावना डोकावत होत्या आणि पुष्कळ वेळा त्यात आगगाडीचा संदर्भ येत होता. लोक प्रवासासाठी नेहमीच त्यांचा उपयोग करतात आणि इकडे तिकडे जातात. या प्रवासात एखादे वेळेस दोन माणसे भेटतात, त्यांचे रस्ते एकमेकांना भिडतात आणि जरी लवकरच ते दोन दिशांना निघून जाणार असले, (जसे The woman on platform & The eyes have it मध्ये आहे) तरी त्यानंतर त्यांची आयुष्ये सांगता येणार नाहीत, अशा प्रकारे काही प्रमाणात बदलतात.

कधी कधी कथेचा नायक (मी जर या शब्दाचा वापर करू शकत असेन तर) तो क्षण निसटू न देण्याचा प्रयत्न करतो; (जसा The Night Train at Deoli मध्ये केलेला आहे.) परंतु हे फक्त शक्य होते ते आपल्यातील मजबूत लोकांना म्हणजे ते गाड्या बदलू शकतात, गाड्यांना आपल्या रुळावरून कधी कधी घसरवूही शकतात (आपला मार्ग बदलायला लावतात). 'The Night Train At Deoli' ही लघुकथा माझ्या छोट्या वाचकांमध्ये खूप प्रिय आहे. आपल्या मनाला, आपल्या आवाक्यात न येणाऱ्या गोष्टींची मनस्वी ओढ लागणे ही भावना त्यांच्या परिचयाची असते.

अनेक वर्षे मी ज्या लघुकथा लिहिल्या, त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या काही कथा श्री. डेव्हिड दावीदार यांनी या कथासंग्रहासाठी निवडल्या आहेत. यातील सुरुवातीच्या काही कथा मी डेहराडूनमधून लिहिल्या आहेत. १९६० मध्ये मी एका कचेरीत जेव्हा पूर्ण वेळ काम केल्यावर एक मुक्त लेखक म्हणून प्रस्थापित होण्यासाठी धडपडत होतो, त्यावेळी त्या लिहिल्या गेल्या. त्यानंतर मी मसुरी या थंड हवेच्या ठिकाणी राहायला गेलो आणि तिथे मी ज्या काही कथा लिहिल्या त्यात त्या वेळी मला लोकांच्या व्यक्तिमत्त्वाचे निरीक्षण करण्याची संधी मिळाली, ते सर्व उतरले आहे. (उदा. Bus stop, pipalnagar) तेव्हा मी परत धडपडत होतो तो काळ आणि तरुण मनात उमललेल्या आशा अनुभवू लागलो.

जसे आपण मोठे होऊ लागतो, तसे नैराश्य आणि आपले भावविश्व उद्ध्वस्त होऊन आपल्यावर वार (आघात) करू लागतात. अशा वेळी, मी माझ्या वडिलांनी शिकविलेल्या कवितेच्या काही ओळींचे स्मरण करून, वरील नकारात्मक भावनांमध्ये, स्वत:ला बुडविण्यापासून वाचवतो.

निर्मळ, चमकणाऱ्या सुंदर गोष्टी
जेव्हा आपल्या तरुण हृदयाला हिंदकळवतात!
शब्दांवाचूनची प्रार्थना आपल्या मनात
अकल्पितपणे उमटते।
जे हरवलेले असते, ते मिळविण्याची ओढ
ज्यांच्यासाठी आपला आत्मा रडत असतो।
हे सर्व कधीच नष्ट होणार नसते।

म्हणूनच काहीतरी हरवून गेल्यावर, त्याच्यासाठी वाटणारी ओढ, अगदी अनिवार ओढ हा माझ्या सर्व कथांचा गाभा आहे. सत्ता आणि पैसा यामुळे ज्या लोकांचा आत्मा मेलेला नसतो, त्या सर्वांनीच आपल्या आयुष्यात निरनिराळ्या वेळी ही जबरदस्त ओढ, ही आस अनुभवलेली असते.

माझ्या सुरुवातीच्या कथांमध्येही ही ओढ दिसते आणि नंतरच्या कथांमध्येही. १९७० च्या दशकात, जेव्हा माझ्या स्वत:च्या खाजगी आणि व्यावसायिक आयुष्यात अनेक संकटांनी, अडचणींनी मला खाली पाडण्याचा प्रयत्न केला, तेव्हा मी लहान मुलांसाठी लिहू लागलो आणि त्यामुळेच मी त्या संकटातून, वाईट काळातून बाहेर पडू शकलो. 'Sita and River' चं 'Angry River' असं नामकरण झालं आणि पुष्कळशा युरोपीय भाषांतून तिचं रूपांतर झालं. हेच आणि असेच 'Panther moon' च्या आणि इतर काही कथांच्या बाबतीत घडलं. अर्थात हे पुस्तक लहान मुलांसाठीचे नसल्यामुळे त्या कथांचा यात समावेश नाही. लहान मुलांसाठी लिहिताना, एका गोष्टीचे भान लेखकाला जरूर ठेवावे लागते ते म्हणजे विषयाला धरून लिहिणे. ज्याबद्दल लिहावयाचे आहे, त्याबद्दलच नेमकेपणाने लिहिणे; कारण त्या वयाच्या मुलांना पाल्हाळ लावलेलं आवडत नाही; किंबहुना भावना वगैरेसाठी त्यांच्याकडे तेवढा वेळच नसतो. तर अशा रीतीने मी लिहू लागल्यामुळे, मला माझ्यापासून लांब जाता येते आणि तरीही

मुलांबद्दल मला फार प्रेम असल्यामुळे, मी त्यांच्या मनात शिरकाव करू शकतो आणि त्यांच्यासाठी लिहू शकतो.

मुलांसारखेच आपण मोठी माणसं जरी एकेक स्वतंत्र व्यक्ती असलो, तरी जसे आपण मोठे होऊ लागतो, तसे सहवासात येणाऱ्या प्रत्येकाचे बरेवाईट गुण घेऊ लागतो. आपला रंग राखाडी रंगाकडे झुकू लागतो.

परंतु तरीही मी वेळोवेळी जुनीच बीजे वापरून लिहू लागतो. छापखान्यात जाण्याच्या तयारीत हे पुस्तक असताना, 'A Love of Long ago' ही कथा मी लिहिली. त्यावेळी ती जुनी ओढ मला वाटू लागली. जेव्हा मी ती कथा लिहून हातावेगळी केली तेव्हा मी स्वत:शीच म्हणालो, 'अरे! माझं तर लिहून झालं. मी आता चौपन्न वर्षांचा आहे.' यापुढे प्रेमकथाही नाहीत आणि प्रेमात पडणंही नको; पण तरीही त्या दिवशी संध्याकाळच्या धूसर संधिप्रकाशात रस्त्यातून घरी परतताना माझ्या लक्षात आलं की, मी तरुण असताना जगातलं अत्यंत सुंदर हसणं असलेली मुलगी मला एकदा भेटली होती. यमुनानगरला जाणारी बस ती शोधत होती; परंतु या घटनेविषयी मी तुम्हाला परत कधीतरी सांगेन.

**– रस्किन बाँड**

मसुरी
२४ मार्च १९८८

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | ८ क्रमांकाच्या फलाटावरची स्त्री | ............ | ११ |
| २) | पंगाऱ्याचे झाड | ............ | १७ |
| ३) | छायाचित्र | ............ | २१ |
| ४) | खिडकी | ............ | २५ |
| ५) | चाचीचा अंत्यविधी | ............ | ३० |
| ६) | एक माणूस जो 'किपलिंग' होता | ............ | ३४ |
| ७) | जे डोळ्यांना दिसले ते | ............ | ३९ |
| ८) | चोर | ............ | ४३ |
| ९) | बँक फोडणारा मुलगा | ............ | ५० |
| १०) | त्याच्या शेजाऱ्याची बायको | ............ | ५५ |
| ११) | देवळीमधील रात्रीची गाडी | ............ | ६० |
| १२) | बस स्टॉप, पिपलनगर | ............ | ६६ |
| १३) | त्याच्या मस्तकावरचे हार | ............ | ९५ |
| १४) | पालनकर्ती देवदूत | ............ | १०० |
| १५) | एका परिचिताचा मृत्यू | ............ | १०७ |
| १६) | पतंगवाला (पतंग बनविणारा) | ............ | १२४ |
| १७) | माकडे | ............ | १२९ |
| १८) | फुलांच्या शोधात | ............ | १३५ |
| १९) | इन्स्पेक्टर लालसाठी आलेली केस | ............ | १४३ |

२०) काळोखातील चेहरा ............. १५१
२१) चांगल्या रीतीने पार पडलेलं काम ............. १५४
२२) मधूची कथा ............. १६०
२३) चेरीचं झाड ............. १६५
२४) देहरातील माझ्या वडिलांची झाडे ............. १७१
२५) चित्याचा चंद्र ............. १८३
२६) बिबट्या ............. २१४
२७) सीता आणि नदी ............. २२२
२८) प्रेमाचे दु:खी गाणे ............. २६५
२९) झाडावर चढायचं वय मागे सरतं तेव्हा... ............. ३०२
३०) खूप जुनं प्रेम ............. ३०७

✦✦✦